प्रबोधक युथ फेडरेशन

# अस्तित्वाचे उद्दिष्टय आणि पथदर्शक विवेचनपत्र

## उद्दिष्टये आणि ध्येयपूर्तीच्या मार्गाचे विश्लेषण

स्वस्ति श्री शालिवाहन शके १९४१, शिवराज्याभिषेक शके ३४५
चैत्र शुद्ध प्रतिपदा ६ एप्रिल २०१९

**PRABODHAK.IN**

# प्रबोधक महाराष्ट्र

महाराष्ट्रातील तरुणांच्या मानसिक, शारीरिक, सामजिक सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, वैचारिक सक्षमीकरणातून महाराष्ट्राचा विकास साधण्यासाठी प्रयत्नशील. मराठी तरुणांना अधिक शक्तिशाली विचारशील आचारशील बुद्धिप्रामाण्यवादी आणि सुसंस्कृत बनवून देशाच्या नेतृत्वासाठी सुसज्ज बनवणे.

## दीर्घकालीन उद्दिष्टे

१ मराठी तरुण प्रशासकीय आणि केंद्रीय शासकीय सेवा परीक्षांमध्ये जावा यासाठी त्याला प्रोत्साहन आणि प्रशिक्षण देणे.

२ मराठी तरुणाने राजकारणात आणि विशेषत: केंद्रीय राजकारणात जावे यासाठी त्याला प्रशिक्षण देणे

३ मराठी तरुणांनी उद्योजक व्हावे आणि मराठी उद्योजकांनी त्यांची साम्राज्ये निर्माण करावीत यासाठी त्यांना प्रशिक्षण मार्गदर्शन आणि मदत करणे

४ मराठी तरुणांना कला क्रीडा साहित्य आणि संस्कृतीच्या क्षेत्रांत प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देणे आणि व्यासपीठ देणे.

५ वरील सर्व उद्दिष्टांसाठी कार्यरत असलेले गुरु प्रशिक्षक आणि संस्था यांना एकत्र आणणे.

६. महाराष्ट्रातील सर्व संस्था आणि मंडळांना एकत्र आणून त्यांच्यासमोर विशिष्ट उपक्रम ठेऊन काम करणे.

७ महाराष्ट्रातील सर्व विचारवंत साहित्यिक अभ्यासक यांना प्रबोधकशी जोडून वैचारिक चळवळ उभी करणे.

८ महाराष्ट्रातील विचारशील तरुणांना एकत्र करून वैचारिक चळवळ उभी करणे.

९ महाराष्ट्रात विविध क्षेत्रांत संशोधन चिंतन लिखाण व्हावे यासाठी व्यासपीठ उपलब्ध करणे.

१० महाराष्ट्रातील सृजनशीलतेला प्रोत्साहन देऊन त्याच्या वाढीसाठी तरुणांना प्रोत्साहित करणे व्यासपीठ उपलब्ध करणे आणि त्याला ठोस आकार देण्यासाठी कार्यक्रम देणे.

## मराठी माणसासाठी पंचशील

१ मराठी तरुण प्रणालीत गेला पाहिजे: राजकारण, प्रशासकीय सेवा आणि शासकीय सेवा: सैन्य पोलिस

२ मराठी तरुण उद्योगात गेला पाहिजे.

३ मराठी माणसाने आर्थिक विकासाच्या नाड्या स्वतःच्या हातात घेतल्या पाहिजेत.

४. देशातील आणि राज्यातील सांस्कृतिक औद्योगिक आर्थिक वैचारिक संस्था महाराष्ट्रात केंद्रीभूत व्हाव्यात आणि मराठी माणसाने त्यात सहभागी व्हावे.

५. मराठी तरुण भाषा संस्कृती महाराष्ट्र प्रतिके यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळावी यासाठी सर्व मराठी माणसांनी झटावे.

## प्रबोधकची त्रिसुत्री वाढ

**संख्यात्मक:** प्रबोधकची सदस्य संख्या वाढवणे प्रबोधक युवा मित्रांची संख्या वाढवणे

**गुणात्मक:** सामान्य माणसांपासून साहित्यिक विचारवंत आणि सर्व मोठ्या माणसापर्यंत प्रबोधक आणि प्रबोधकचे ध्येय पोहोचवणे.

**भौगोलिक:** महाराष्ट्रातील प्रशासकीय विभाग जिल्हे तालुके आणि गावांमध्ये प्रबोधक पोहोचवणे

**प्रबोधक युथ फेडरेशन**

# कृतीपत्रिका

- करियर
- शासकीय नोकरी
- राष्ट्रीय परीक्षा प्रशिक्षण केंद्र
- स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस
- उद्योजकता विकास केंद्र
- प्रबोधक कट्टा
- संस्कार वर्ग
- उत्सव
- मराठी विकास
- सृजनशीलता केंद्र
- एकत्रीकरणसमतेसाठी प्रबोधक
- मराठी ज्ञानभाषा उपक्रम
- मिओ मराठी राष्ट्रधर्म उपक्रम (विश्वविजयी व्हा!)

# करियर

१. करियरची माहिती वेबसाईट आणि एप वर देणे करियर मार्गदर्शक पुस्तिका
२. प्रत्येक गावांत एक प्रबोधक मित्र असावा : प्रबोधक मित्र प्रशिक्षण
३.करियर मार्गदर्शन व्हिडिओ
४. स्थानिक रोजगार केंद्र:
प्रभागनिहाय, गावागावात, तालुकानिहाय आणि जिल्हानिहाय स्थानिक रोजगार केंद्र उभे करणे आवश्यक आहे. किमान आठवड्यातून एक दिवस हे केंद्र खुले असेल.

**रोजगार केंद्राचे खालील कार्य असेल:**
१. शासकीय नोकऱ्यांची माहिती बोर्ड
२. कॉलेज व्याख्यान
३. दहावी बारावी मार्गदर्शन शिबिरे
४. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर
५. उद्योग प्रशिक्षण
६. करियर टेस्ट

५. परदेशी शिक्षणासाठी जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना बँकांची कर्जे सुलभतेने मिळावीत यासाठी प्रयत्न केले जातील. यासाठी **मराठी सहकारी बँकांशी टायअप करता येईल.** अधिकाधिक तरुणांना उच्च शिक्षणासाठी असणाऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न केला जाईल.
६. **मराठी फंड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल**. यातून मराठी तरुणांना शिक्षण आणि उद्योगासाठी कर्जाऊ पैसे देता येतील.
७. शिष्यवृत्ती: साहित्यनिर्मिती, कला , क्रीडा आणि , उच्चशिक्षण
**उद्दिष्ट्य :**
**प्रत्येक गावात किमान एक प्रबोधक मित्र, तालुका, जिल्हा आणि प्रशासकीय विभाग निहाय रोजगार केंद्र**

# शासकीय नोकरी

**मराठी तरुण शासकीय नोकरीत जावा, यंत्रणेत जावा, प्रशासकीय सेवांमध्ये जावा यासाठी त्या नोकऱ्यांची माहिती असणे आवश्यक आहे. याकरिता कायमस्वरूपी यंत्रणा तयार करणे आवश्यक आहे.**
स्थानिक रोजगार केंद्र यासाठी काम करेल, आणि प्रबोधक मित्र यासाठी मदत करतील. यामध्ये ठिकठिकाणी सरकारी नोकरीचे फलक लावता येतील. तसेच परिसरातील मुलांचे व्हॉट्स एप नंबर घेऊन ग्रुप्स बनवले जातील. ज्यावर प्रबोधक कडून दर आठवड्याला अपडेट्स जातील.
नोकरी विषयक लेख स्मार्ट महाराष्ट्र मध्ये प्रकाशित करता येतील.
**उद्दिष्ट्य :**
**प्रत्येक गावात किमान एक प्रबोधक मित्र, तालुका, जिल्हा आणि प्रशासकीय विभाग निहाय रोजगार केंद्र**

प्रत्येक मराठी तरुण योग्य करियरमध्ये जावा यासाठी प्रबोधक प्रयत्नशील रहावे. यासाठी सर्व मराठी तरुणांपर्यंत करियरची योग्य माहिती पोहोचणे आवश्यक आहे. सर्व तरुणांना योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. याकरिता प्रबोधकने महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना सुलभपणे करियरची माहिती उपलब्ध होऊ शकेल आणि त्यांच्या जवळ एखादा प्रबोधक मित्र उपलब्ध होऊ शकेल अशी तरतूद करणे आवश्यक आहे. प्रबोधकने सर्व गावागावात आणि शहरातील स्थानकांमध्ये प्रबोधक मित्र तयार होतील असे पाहावे ज्यांच्याकडे महाराष्ट्रातील तरुण सहजतेने पोहोचू शकेल.

# राष्ट्रीय परीक्षा प्रशिक्षण केंद्र

**यूपीएससी, स्टाफ सिलेक्शन, रेल्वे, आयबीपीएस आणि बँकिंग परीक्षा, नीट, आयआयटी, व्यवस्थापन कोर्सेस अशा अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी मराठी तरुण बसण्याचे प्रमाण वाढवणे, आणि त्यासाठी सुयोग्य शुल्कात त्यांना प्रशिक्षणाची व्यवस्था करून देणे हे मुख्य काम असेल.**

**उद्दिष्ट्य: तालुकानिहाय किमान एक प्रशिक्षण केंद्र**

# स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस

१ एण्ड्रोइड
२ सर्टिफिकेट कोर्स इन बिजनेस मेनेजमेंट
३ नाट्य आणि  फिल्म
४ इंडिया स्टडीज
५ परदेशी भाषा इंग्रजी जर्मन जापनिज फ्रेंच
६ उद्योग सल्लागार
७ लेखन
९ सर्टिफिकेट इन फायनान्स आणि अकाउंटस
१० हार्डवेअर आणि चीप लेवल
१२ व्हिडिओ एडिटिंग
१३ हेअर स्टाईल आणि ब्युटीशीयन
१४ ॲनिमेशन आणि स्पेशल इफेक्ट्स
१५ योगा
१६ कृषी विकास
१७ सर्टिफाईड एक्स्पोर्ट मेनेजर
१८ सर्टिफाइड आयपी मेनेजर
१९ शेळीपालन
२० डेअरी
२१ मधुमक्षिका पालन

हे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी स्थानिक रोजगार केंद्राची असेल. ह्यासाठी स्थानिक प्रशिक्षण संस्थांना सोबत घेता येईल. मात्र प्रबोधकच्या कोर्सची फी वाजवी असेल याकडे लक्ष दिले पाहिजे.

**उद्दिष्टय: तालुकानिहाय किमान एक प्रशिक्षण केंद्र. मोठ्या गावात एक प्रशिक्षण केंद्र.**

**मराठी तरुणांना पारंपरिक शिक्षणासमवेतर रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे याकरिता स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस तयार करणे आवश्यक आहे. रोजगारासमवेत स्वयंरोजगारासाठी कोर्सेस घेण्याकडे अधिक कल असला पाहिजे. प्रबोधक खालील स्किल डेव्हलपमेंट कोर्सेस तयार करण्याचा आणि ठिकठिकाणी राबवण्याचा प्रयत्न करेल. कालानुरूप आवश्यकतेनुसार ह्यात बदल होऊ शकेल**

# उद्योजकता विकास केंद्र

महाउद्योगच्या माध्यमातून महाराष्ट्रात उद्योजकतेचा विकास करणे प्रबोधकचे उद्दिष्टय आहे. मराठी तरुणांमध्ये उद्योगाचे वारे वहावे, महाराष्ट्रातील गावागावात उद्योजक आणि उद्योग निर्माण व्हावेत, आणि महाराष्ट्रातील उद्योगांची साम्राज्ये उभी राहावीत हे प्रबोधकचे उद्दिष्ट्य आहे. हे सध्या होण्यासाठी, अतिशय काटेकोर आणि शिस्तबद्ध प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्रबोधक मित्रांप्रमाणे यासाठी गावोगावी उद्योग सल्लागार निर्माण करणे आवश्यक आहे. किमान तालुक्यात एक आणि प्रत्येक मोठ्या गावात एक सल्लागार असावा. हे उद्योग सल्लागार, आपापल्या गावात/तालुक्यात उद्योगी व्हा! कार्यशाळा घेतील.

**कृती:**
१. **उद्योग सल्लागार** कार्यक्रमातून उद्योग सल्लागारांची नेमणूक
२. उद्योगी व्हा! उद्योजक सेमिनार
३. **प्रदर्शने: वर्षभरातून किमान** एक मोठे प्रदर्शन भरवणे आणि इतर प्रदर्शनातून सहभाग
४. उद्योग कार्यशाळा: आयोजित करणे आणि त्यात सहभागी होणे.
५. उद्योग स्नेहसंमेलन: किमान १ लघुउद्योगास मदत.
६. उद्योग संघटन: महाराष्ट्रातील उद्योजकांना एकत्र आणणे त्यांचा विकास आणि प्रश्न
७. मीडिया pannel मध्ये सहभाग.
८. लोन प्रपोजल्स: किमान १० प्रति महिना
९. महाराष्ट्रातील उद्योगांना बांधणारी वेबसाईट
१०. मार्केटिंग साखळी तयार करणे
११. केंद्रीयभूत एक्स्पोर्ट केंद्र
१२. गुंतवणूक केंद्र
१३. आयपी केंद्र
१४. नोंदणी व कम्प्लायन्सेस केंद्र
१५. लिस्टिंग सुविधा
जिल्हा पातळीवर तालुका पातळीवर आणि ग्राम पातळीवर उद्योग केंद्र
१६. ग्राहक जागरूकता केंद्र
१७. फूडपार्क तयार करणे. महाराष्ट्रात किमान ५
१८. उद्योगक्लस्टर्स तयार करणे आणि त्यासाठी मदत करणे
१९. टेक्सटाईल पार्क
२०. एमआयडीसी: महाराष्ट्रातील एमआयडीसी मध्ये उपलब्ध गाळे, उद्योग यांचा अभ्यास करून, विविध ठिकाणी महाउद्योग गाळे घेऊन चालवावयास देईल.
२१. महाराष्ट्रातील महिला बचत गट एकत्र करणे
२२. महाराष्ट्रातील चेम्बर ऑफ कॉमर्स एकत्र करून प्रत्येक कामात सहभागी करून घेणे.
२३. महाराष्ट्रातील बँकांशी टाय अप करून, महाराष्ट्रातील उद्योजकांना वेळेत आणि सुलभतेने कर्ज मिळेल असे पाहणे. यासाठी, शक्य झाल्यास मराठी बँकांशी अधिक टाय अप करून त्यांच्याकडे उद्योजकांचा पैसा एकत्र करणे, आणि कर्ज मिळवून देणे.
२४. **महाउद्योग फंड** तयार करून ज्यातून महाउद्योग कर्ज देऊ शकेल.
२५. **<u>महाउद्योग इंडस्ट्रीज लिमिटेड</u>**
१. महाराष्ट्रातील विविध उद्योगांची ही पालक कंपनी म्हणून काम करेल. सदस्य उद्योगांचे मार्केटिंग करण्याचे मुख्य काम कंपनी करेल. त्याचबरोबर, विविध उद्योग आणि उत्पादने कंपनी सुरु करेल, ज्यामध्ये विविध उद्योजक एकत्र येऊन उद्योग सुरु करू शकतील.
२. कंपनी, मनुष्यबळ, स्टेशनरी आणि होलसेल-रिटेल उद्योग सेवा सुरु करेल. ह्यातून कंपनी मराठी उद्योजकांना काम देऊ शकेल.
३. कंपनीच्या मालकीच्या स्वतःच्या जागा असतील. ऑफिसेस, वेअरहाउसेस, कोल्ड स्टोरेजेस, शेतजमिनी इ.
४. कंपनी पाच वर्षात लिस्ट होण्याचा प्रयत्न करेल.

# प्रबोधक कट्टा

महाराष्ट्रामध्ये प्रबोधन आणि ज्ञानाचे वारे वाहिले पाहिजेत. या उद्देश्याने, प्रबोधन कट्टा हा उपक्रम असेल. प्रबोधक कट्ट्यामध्ये, ज्ञानवर्तुळ केंद्र आणि विचारमंथन असे दोन भाग असतील. ज्ञानवर्तुळ उपक्रमात दैनंदिन उद्योग, नोकरी आणि व्यवसायासाठी लागणाऱ्या

विविध ज्ञानशाखांचे व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाईल. यासाठी प्रति कट्टा माफक शुल्क स्वीकारले जाईल. महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये असे कट्टे भरावेत. मराठी तरुणांनी सतत नवीन काहीतरी शिकत राहिले पाहिजे.संशोधन केले पाहिजे, ज्ञान मिळवले पाहिजे देत राहिले पाहिजे.

प्रबोधकशाखा गल्लोगल्ली निघून त्याठिकाणी तरुणाई जमून चर्चा, संमेलने, शिबिरे, कार्यशाळा भरल्या पाहिजेत.

**विचारमंथन:**
i) दर महिन्याला आणि नंतर प्रत्येक आठवड्याला एक व्याख्यान झाले पाहिजे. सुरुवातीला जिल्हा तालुका नंतर गाव पातळीवर व्याख्याने व्हावीत. व्याख्यानाचे विषय लोकांच्या आवडीप्रमाणे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, आणि स्थानिक पातळीवरचे असावेत.
ii) याचसोबत स्थानिक पातळीवर चर्चा आणि स्पर्धा ह्यामध्ये वक्तृत्त्व, चित्रकला, निबंध इ. घेतल्या जाऊ शकतात.

**ज्ञानवर्तुळ**
i) विविध ठिकाणी तरुणांना गोळा करून, एखाद्या व्यावहारिक विषयावर दोन तासांचे व्याख्यान घेतले जावे. ह्या व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरे व्हावीत. या उपक्रमाचा हेतू मराठी तरुणांना विविध व्यावसायिक स्किल्स प्राप्त होणे जेणेकरून नोकरी आणि व्यवसायात त्यांना त्याचा उपयोग करता येईल. यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाऊ शकेल.
ii) महिन्यातून एकदा एखाद्या विषयावर एकत्रित कार्यशाळा घेता येईल. यासाठीही काही नाममात्र शुल्क आकारता येईल. यानिमित्ताने तालुका/जिल्हा पातळीवर तरुण एकत्र येऊ शकतील.

**केंद्र:**
i) आयुर्वेदिक, निसर्गोपचार अशी केंद्रे गल्लोगल्लीत सुरु करता येतील ज्याचा फायदा आजूबाजूच्या नागरिकांना होऊ शकेल.
ii) येथे वाचनालय आणि अभ्यासिका केंद्र सुरु करता येईल

# संस्कार वर्ग

महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि तरुणांना योग्य संस्कार आणि मार्गदर्शन व्हावे यासाठी प्रबोधक विविध संस्कार वर्ग आयोजित करेल. या संस्कार वर्गाचे मुख्य उद्दिष्ट महाराष्ट्रातील तरुणांना खेळ, शास्त्र शास्त्र, योग तसेच उत्तम विचार, चर्चासत्रे आणि व्याख्यानांमध्ये गुंतवणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करणे हे असेल.

**संस्कार वर्ग**
१. दर आठवड्याला संध्याकाळी दोन तास शिबिर
२. भारतीय शस्त्रकला
३. योगा
४. खेळ शिबिरे: क्रिकेट कबड्डी धनुर्विद्या
५. इंग्रजी, परदेशी भाषा
६. व्याख्यानांसाठी वक्तृत्व इतिहास ज्ञान विज्ञान साहित्य हे मुख्य विषय असतील.
७. विविध स्पर्धा घेतल्या जातील.
८. ५ वी ते  १० वी अभ्यास वर्ग घेतले जातील. तसेच ११ वी ते १५ वी वर्गही घेता येतील.

याशिवाय दरवर्षी दिवाळी शिबिर आयोजित केले जाईल. ग्रामीण तरुणांना विद्यार्थ्यांना शहरात आणणे, शहरातील विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात घेऊन जाणे यासाठी शिबिरे आयोजित करता येतील.
ii) दर दोन महिन्यांनी चिंतन शिबिरे घेता येतील.
iii) याशिवाय सहली आणि विविध कार्यक्षेत्रांना भेटी आयोजित केले जातील.

# उत्सव

भारतीय समाज उत्सवप्रिय आहे. महाराष्ट्रात उत्सवाची आवड विशेष आहे. याकरिता लोकांना एकत्र करणे, त्यांच्यात आनंदी आणि सकारात्मक भावना पसरवणे आणि प्रबोधनात्मक कामासाठी उत्सव उत्तम माध्यम आहे.

**खालीलपैकी विविध उत्सव आणि दिन साजरे केंद्रीय आणि स्थानिक पातळीवर साजरे केले जावेत:**

१. १२ जानेवारी:
२. मकरसंक्रांत: मराठी राष्ट्रधर्म दिवस
३. २६ जानेवारी:

४. २६ फेब्रुवारी: स्वातंत्र्यवीर दिन
५. २७ फेब्रुवारी: मराठी भाषा दिन
६. फाल्गुन वद्य तृतीया: शिवजयंती
७. चैत्र शुद्ध प्रतिपदा: गुढीपाडवा
८. अक्षय तृतीया
९. गुरुपौर्णिमा
१०. आषाढी एकादशी
११. १ मे कामगार दिन आणि महाराष्ट्र दिन: महाराष्ट्रासंबंधित चर्चा आणि व्याख्यानमाला
१२. बुद्धजयंती
१३. २६ जुलै: साहस दिन:
१४. ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा: साम्राज्य दिन
१५. स्वातंत्र्य दिन
१६. दसरा
१७. कोजागिरी पौर्णिमा
१८. दीपावली: धनत्रयोदशी
१९. लोकशाही दिवस
२०. सावित्रीबाई फुले जन्मदिन: स्त्री-स्वातंत्र्य दिवस
२१. ग्रामसभा दिन: २ ऑक्टोबर
२२. आंबेडकर जयंती: विद्वत्ता दिन

# मराठी विकास

मराठी भाषा संस्कृती, शाळा, शिक्षण यांच्या विकासासाठी मराठी इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन च्या माध्यमातून प्रबोधक उपक्रम हाती घेईल.

मराठी भाषा ज्ञानभाषा झाली तरच तिचा विकास अधिक वेगाने होऊ शकेल. मराठी व्यक्ती, परंपरा, संस्कृती यांच्याविषयी मराठी माणसाच्या मनात अभिमान असावा, मराठी संस्कृती, कला यांच्या विकासासाठी सर्व मराठी जनांनी एकत्र प्रयत्न करावेत, आणि मराठी भावविश्व अधिक समृद्ध करून प्रत्येक पिढीने पुढच्या हाती द्यावे ही भावना प्रत्येक मराठी घराघरात निर्माण होणे आवश्यक आहे. समृद्ध मराठी परंपरेचा वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी आणि तो मराठी तसेच अमराठी आणि परदेशी लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम प्रबोधक हाती घेईल.

१ मराठी पुस्तकांचे इतर भाषेत भाषांतर आणि इतर पुस्तकांचे मराठीत भाषांतर
२ उत्तम ज्ञान मराठीत यावे यासाठी पुस्तके व्हिडिओ इ.
३ सांस्कृतिक स्पर्धा कार्यक्रम
५ आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊ इच्छिणाऱ्या मराठी तरुणांना मार्गदर्शन व मदत
६ मराठी शाळा टिकवण्यासाठी आणि वाढवण्यासाठी
७ विविध अभ्यासक्रमाचे संदर्भ साहित्य मराठीत यावे यासाठी
८ मराठीचा वापर वाढावा यासाठी
९ मराठी प्रशिक्षण कार्यक्रम
१० मराठी सण उत्सव यामध्ये अमराठी आणि परदेशी लोकांचा सहभाग वाढवणे.
११ इतर राज्यांमध्ये विविध कार्यक्रमाला मराठी लोकं पाठवणे...इतर राज्यांशी संवाद वाढेल असे पाहणे
१३ परदेशी मराठी मंडळांना उपक्रमात सहभागी करून घेणे.
१४ मराठीतून विविध विषयांवर लेखन आणि चर्चा
१५ मराठी समाज भाषा शाळा आणि इतर गोष्टींवर चर्चा आणि ठोस भूमिका. दबाव गट
मराठी विकास समिती.

# सृजनशीलता केंद्र

मराठी माणसाच्या विकासातील महत्वाची गोष्ट म्हणजे त्याच्या सृजनशीलतेचा विकास. मराठी माणूस नाविन्याचा भोक्ता आहे. ह्या कलेचा जितका विकास होईल, तितका एक समाज म्हणून मराठी माणूस पुढे जात राहील आणि प्रबोधकच्या उद्दिष्ट्याप्रमाणे राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय स्तरावर पुढे जाऊ शकेल.
याकरिता मराठी माणसाच्या सृजनशीलतेच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम हाती घेतले जातील.
**यामध्ये खालील गोष्टीचा समावेश राहील:**
i) लेखन प्रशिक्षण आणि विविध विषयांमध्ये मराठीत लेखनासाठी उद्युक्त करणे
ii) संशोधन लिखाण
iii) कलाविषयक कार्यशाळा आणि
iv) नाविन्यपूर्ण उद्योग: प्रोत्साहन आणि आर्थिक व इतर मदत

# एकत्रीकरण

कुठल्याही समाजाच्या विकासासाठी, समाजाच्या विकासासाठी कार्यरत विविध संस्था आणि व्यक्ती एकत्र येणे आवश्यक असते. मराठी समाजासाठी आणि महाराष्ट्रासाठी विविध विषयांमध्ये कार्यरत संस्था आणि माणसे यांना एकत्र आणण्यासाठी प्रबोधक कार्यक्रम राबवेल.

**संस्था**
१ महाराष्ट्रदिनाला कार्यक्रम वर्षभराचा गोषवारा
२ स्नेहसंमेलन आणि शिष्यवृत्ती
३. संस्थांना मार्गदर्शन

**विचारवंत**
१. महाराष्ट्रातील शिक्षक व प्राध्यापक एकत्र करणे: स्पर्धा शिबिरे इ.
२. कलाकारांमध्ये स्पर्धा लेखन
३. कलात्मक शिबिरे कार्यशाळा
४. इतिहास राज्यशास्त्र आणि तत्वज्ञान विषयावर कार्यशाळा स्पर्धा इ.
५. साहित्य आणि नाट्यसंमेलनात सहभाग
६. वक्ता प्रशिक्षण शिबिरे

# समतेसाठी प्रबोधक

समाजातील  सर्व वर्गात, घटकात समानता, समता, बंधुता यावी आणि विकासाच्या समान संधी सर्वांना उपलब्ध व्हाव्यात ह्यासाठी प्रबोधक कार्यशील राहील. यासाठी सद्यस्थितीचे आकलन (अधिष्ठान),संशोधन, उपाययोजनांची चर्चा, विचारविनिमय, प्रत्यक्ष दुर्बल आणि वंचित घटकांमध्ये जाऊन काम ह्या सुत्रीचा प्रबोधक वापर करेल.
**ह्या उपक्रमात विशेषतः खालील गोष्टींचा समावेश होईल:**
१) आदिवासी संघटन आणि आदिवासी कला उद्योग यांना प्रोत्साहन देणे.
२) महाराष्ट्राच्या विविध भागात ग्रामीण माहिती शिबिरे घेणे
३) शेती मार्गदर्शन
४) कोकण विकास
५) समतादूत: तालुक्यात आणि गावागावात, ज्यांचे काम गावातील तंटे संपवून सामोपचाराची भूमिका घेणे असेल.
६) ग्रामप्रबोधक केंद्र:महाराष्ट्रातील गावांमध्ये सुरु करणे, जे प्रामुख्याने ग्रामीण योजना लोकांपर्यंत पोहोचवणे आणि  मदत करणे, ग्रामीण रोजगार केंद्र, ग्राम उद्योग केंद्र आणि कृषी सेवा केंद्र सांभाळेल.
७) आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना उद्योग, शिक्षण, विकासाच्या संधी आणि मूलभूत गरजा भागवण्यासाठी आर्थिक मदत करण्याचा, मिळवून देण्याचा प्रयत्न करणे.

# मिओ मराठी राष्ट्रधर्म उपक्रम (विश्वविजयी व्हा!)

मराठी तरुणांनी आणि महाराष्ट्राने देशाचे नेतृत्व केले पाहिजे ह्या विचारांनी मराठी तरुणांना भारून टाकणे आणि त्यांच्याकडून ते काम करवून घेण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि प्रोत्साहन देणे हे काम मराठी राष्ट्रधर्म उपक्रम करेल.

**ह्यामध्ये खालील गोष्टींचा अंतर्भाव असेल.**

१ मराठी तरुणांना उच्च शिक्षणासाठी प्रतिष्ठित संस्थांमध्ये पाठवणे. (मराठी बँका: लोन सुविधा; राहण्याची सोय परदेशी मंडळे; शिक्षण सल्लागार; मराठी फंड; मराठी परदेशस्थ नागरिक जे मदत करु शकतात त्यांना एकत्र करणे)
२ मराठी विद्यार्थ्यांचा एक्सचेंज प्रोग्राम
३ मराठी तरुणांना परदेशी नोकऱ्यांसाठी तयार करणे. युनिसेफ नासा वर्ल्ड बँक इ.
४ इंग्रजीत उत्तम विचार मांडू शकतील असे मराठी वक्ते तयार करणे.
५ संशोधन मदत संशोधनासाठी बाहेर जाऊ इच्छिणाऱ्या तरुणांना मदत
६ निर्यात करु इच्छिणाऱ्या उद्योजकांना मदत: प्रशिक्षण बायर सेलर मीटिंग आर्थिक मदत व्यापार केंद्र आणि एक्सपोर्ट मदत

# ||प्रबोधक म्हणावे अशा माणसाला ||

निश्चयो ज्याचा असा दृढ झाला
जनसेवेचा वसा ज्याने घेतला
जगण्याचा मंत्र ज्याला कळाला
**प्रबोधक म्हणावे अशा माणसाला ।।**

निश्चयो ज्याचा कदापि ढळेना
अनाचार ज्याच्या मनास शिवेना
भूददयेच्या जपतो जो माळा
**प्रबोधक म्हणावे अशा माणसाला ।।**

सदा सर्वदा सज्जनाचा संग
मुखात सदा जनाचा अभंग
जीवसेवेकरिता जो जन्मास आला
**प्रबोधक म्हणावे अशा माणसाला ।।**

मनी स्वार्थबुद्धी त्यागून जातो
करि ध्येयनिष्ठा घेऊनी चालतो
स्वये दुःकामना नाही जयाला
**प्रबोधक म्हणावे अशा माणसाला ।।**

करी जो प्रपंच सदा विश्वाचा
जणू तो आहे अंश सुखाचा
दीनास पाहूनी जो व्याकूळ झाला
**प्रबोधक म्हणावे अशा माणसाला ।।**

- जयेश शत्रुघ्न मेस्त्री

प्रबोधक हा समाजाचा एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रातील तरुणांना योग्य वळण लावणे त्यांना मार्गदर्शन करणे आपल्या विभागातील मुलांचे करियर शिक्षण उद्योग आणि इतर गोष्टींची काळजी करणे हे प्रबोधकांचे काम असेल. त्याचबरोबरच आपल्या विभागातील विकासकामे पाहणे प्रश्न योग्य ठिकाणी मांडणे हे तो पाहील. तरुणांचे काही चुकत असेल तर त्यांना योग्य मार्गावर आणण्याचे काम प्रबोधक करेल. यासाठी जिल्हानिहाय प्रबोधक केंद्र स्थापन होईल. आठवड्याचे संस्कार विकास वर्ग घेतले जातील. वर्षातून एक किंवा दोन वेळेस शिबिरे होतील. आपल्या भागातील तरुणांना करियर नोकरी उद्योग आणि रोजगार याविषयी मार्गदर्शन करण्याचे काम प्रबोधक करेल.

प्रबोधक

Prabodhak.in

"मला १०० माणसे हवीत"


## कार्यकर्ता कसा असावा?

स्वामीजी म्हणतात, मला माणसे हवी आहेत, सशक्त उत्साही, श्रद्धावान आणि निष्कपट अशी माणसे हवी आहेत. अशी शंभर माणसे जरी मिळाली तरी जगात क्रांती घडवता येईल. वत्सांनो, विरांनो थोर हृदयाच्या तरुणांनो उठ आणि कामाला लागा.

१. देशातील दुर्बल, गरीब लोक आणि त्यांच्या दैन्यावस्थेबद्दल, देशातील प्रश्नांबद्दल कार्यकर्त्याला कळवळा असणे आवश्यक आहे. आपल्या बांधवांची आजची अवस्था पाहून पीळ पडला पाहिजे आणि त्यांचे कल्याण व्हावे अशी तळमळ असली पाहिजे.

२. त्याग अस्सल गोष्ट आहे. त्याग बाणल्याखेरीज कुणीही दुसऱ्यासाठी सर्वस्वाचा होम करून कार्य करायला प्रवृत्त होऊ शकत नाही, कुणीही सत्य प्रेम आणि निष्कपटता यांच्या शक्तीला रोखू शकत नाही. जनसेवा करता करता ज्ञानमार्गावरही तुमची प्रगती होईल,

३. फक्त कामाला आधी सुरुवात करा, मग पाहाल इतकी शक्ती तुमच्यात येईल की ती सावरता सावरली जाणार नाही. दुसऱ्यासाठी एवढेसे जरी काम केले तरी आतली शक्ती जागृत होते.



४. नेतेपणाचा आव आणू नका, त्यांचे सेवक बाणा, कुणावर शासन करण्याचा, अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करू नका

५. प्रत्येकाशी वागताना सहनशीलता बाळगा. लोकांच्या भिन्न मतांकडे सहिष्णुतेने पहा, धीर चिकाटी आणि पावित्र्य गुणांचाच विकास होईल. आपल्या सामर्थ्यानिशी आपल्या कल्पनांना चिकटून राहा, आज मितीला कितीही अडचणी आल्या तरी सरतेशेवटी जग तुमचे म्हणणे ऐकल्याशिवाय राहणार नाही.

६. कुणावरही कोरडी टीका करण्यापेक्षा रचनात्मक, भावात्मक गोष्टी लोकांपुढे मांडा.

७. तुमचे हृदय, आशा-आकांक्षा खुप विशाल बनू द्या, सारे जग व्यापू द्या. धर्मवेड्या माणसाची उत्कटता आणि जडवाद्यांची व्यापकता ह्या दोन्ही गोष्ट हव्या आहेत. आपले हृदय महासागराप्रमाणे सखोल आणि आकाशाप्रमाणे व्यापक असले पाहिजे.

८. तमसो मा ज्योतिर्गमय हीच आपली प्रार्थना असेल.

- स्वामी विवेकानंद